International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# विकास प्रकल्पांमुळेपर्यावरणावर झालेले परिणाम

**प्रा. पूजा हिरामण गांगोडे**

*समाजशास्त्र विभाग, के. टी. एच. एम. महाविद्यालय नाशिक*

*Corresponding Author - प्रा. पूजा हिरामण गांगोडे*

**DOI - 10.5281/zenodo.10967457**

**गोषवारा :**

*आज पर्यावरणाचा ऱ्हास हि एक संपूर्णजगाला भेडसावणारी समस्या आहे. प्रामुख्याने विकसनशील देशांमध्ये पर्यावरण ऱ्हास हि एक गंभीर समस्या झाली आहे. विकसनशील देशांमध्ये पर्यावरण ऱ्हासाच्या कारणाविषयी आणि परिणामाविषयी जागरूकता निर्माण झालेली आहे. पण विकसनशील देशांमध्ये याचा अभाव आहे.आज मानवाने आपल्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणावर मोठ्या प्रमाणात वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. आपले अस्तित्व आपल्या भोवती असलेल्या भौतिक आणि जीवित पर्यावरणाच्या प्रकृती आणि सुस्थितीवर अवलंबून आहे. आपली प्रत्येक व्यक्तिगत किंवा संघटीत कृती, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या पर्यावरणावर काही परिणाम करत असतात. म्हणून निसर्गातील प्रत्येक घटना, त्यांचे कार्य, त्यांची रचना, त्यांचा नैसर्गिक घटकांशी असलेला सबंध आणि आपल्या दैनदिन जीवनातील परस्पर सबंध जाणून घेणे प्रत्येकासाठी महत्वाचे आहे.*

***Keyword:* *Development Project, Displacement, Environmental Change's, Environmental Impacts*.**

**उद्दिष्टे :**

१. विकास प्रकल्पांमुळे पर्यावरणावर झालेले परिणामाचा अभ्यास करणे.

२. विकास प्रकल्पांमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणामयांचा अभ्यास करणे.

**संशोधनपद्धती :**

प्रस्तुत संशोधनाकरिता 'निरीक्षण संशोधन पद्धती' चा वापर केला आहे. तथ्य संकलनासाठी द्वितीय स्त्रोताचा प्रामुख्याने वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्यांचा वापर केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे, शासकीय कार्यालयीन माहिती, साप्ताहिके, मासिके, वार्षिक अंक, इंटरनेट इ. चा समावेश होतो.

**विकास आणि पर्यावरण :**

पर्यावरण आणि विकास या दोघांमध्ये घनिष्ट सबंध आहे. पण हा सबंध फक्त आज पुरता मर्यादित नाही तर याला प्राचीन काळाचा देखील सबंध आहे. प्लेटो ने देखील या संदर्भात विचार मांडलेले आहे. ज्याप्रकारे रोपाच्या वाढीसाठी जल,

वायू, प्रकाश इ. आवश्यक आहे. त्याचप्रकारे सामाजिक संस्थेच्या विकासाकरिता वातावरण आवश्यक आहे. मार्क्सच्या काळापासून व्यक्ती, समाज, आणि प्रशासन या संदर्भात चर्चा केलेली आहे.

पर्यावरण हा शब्द दोन अक्षरांनी मिळून बनलेला आहे 'परी' म्हणजेच चारही दिशा आणि 'आवरण' म्हणजेच सर्व बाजू घेरणारा (सुरक्षा कवच )म्हणजेच 'पर्यावरण' होय. यामध्ये जल, मृदा, वनस्पती इत्यादी सर्वांचाच समावेश होतो. हे सर्व एकत्रित येऊन एक प्रकारचे संतुलित वातावरण तयार करतात. ज्यावर संपूर्ण मानवी जीवन आधारित असते. जेव्हा याच पर्यावरणामध्ये मानव असमतोल निर्माण करण्याचा प्रयत्न करतो, त्याला हानी पोहचवतो तेव्हा हेच पर्यावरण आपले अस्तित्व दाखवल्याशिवाय राहत नाही. आज मानवाने पर्यावरणाला पोहचवलेल्या हानीमुळे आज संपूर्ण मानवाला नैसर्गिक आपत्ती, पूर, दुष्काळ आणि यासारख्या अनेक आपत्तीना सामोरे जावे लागत आहे. पर्यावरणाने संपूर्ण मानव जातीसाठी एक सुरक्षित वातावरण तयार केलेले आहे. आज प्रत्येकाचे हे कर्तव्य आहे कि आपण संपूर्णसृष्टीचे रक्षण केले पाहिजे. पण मानव हा आपल्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात हानी पोहचवत आहे. आज ज्या वेगाने मानव हा स्वतःचा विकास करू राहिला, अगदी त्याच वेगाने तो संपूर्ण पर्यावरणाला हानी निर्माण करतो आहे. यामुळे मानवजाती हि संकटात आलेली आहे.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत वातावरणाची समस्या गंभीर नव्हती, परंतु महायुद्धानंतर मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण आणि जंगले उद्ध्वस्त करण्याचे प्रमाण हे वाढत गेले. त्याचे परिणाम म्हणून प्रदूषण हि संपूर्णजगातील सर्वात मोठी गंभीर समस्या आहे. आज वाढते जीवाश्म इंधन, रासायनिक पदार्थ, परमाणु इ. च्या वाढत्या उपयोगामुळे तसेच जंगलतोड, या सर्वांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात मानवाला विविध समस्यांचा सामोरे जावे लागते आहे.

पर्यावरण प्रदूषणाची समस्या हि आधुनिक युगाची देणगी आहे. वैज्ञानिक उन्नती होण्यासोबतच उदयोग धंद्याची वाढ आणि प्रगती झाली. अनेक मोठ-मोठे कारखाने स्थापित केले गेले. घातक असे रसायने तयार होऊ लागले. या सर्वांमुळे आज संपूर्ण पर्यावरण हे घातक होऊ लागले आहे. तसेच मानवाच्या पाण्याच्या समस्येसाठी जे मोठ-मोठी धरणे बांधली गेले. त्याचा फायदा देखील झाला पण तो एका विशिष्ट वर्गाला गरीब – आदिवासी मात्र या योजनेचे बळी पडले. आणि मोठ्या प्रमाणात विस्थापित होऊ लागले. मोठ्या प्रमाणात प्रदूषके पाण्यात सोडल्यामुळे गोदावरी सारखी मोठी नदी तसेच अनेक नद्या या प्रदूषित झाल्या आहेत. आज विकासाचे प्रतिक म्हणून उभे असलेले महामार्ग लाखो लोकांचे विस्थापण करून उभे राहिले होते.

वाहनाची नव-नव्या आविष्काराने आणि त्यांच्या संख्येने मानवाची प्राणवायू ला देखील

दुषित केले आहे. वाहनामधून निघणाऱ्या विषारी वायूमुळे संपूर्ण पर्यावरणातील हवा दुषित होऊ लागली आहे. लुइ थोमस यांनी आपले पुस्तक “The Lives Of a Cell” मध्ये पृथ्वीला एक जिवंत संज्ञा म्हणून संबोधले आहे. आणि पृथ्वीला चारही बाजूच्या वातावरणाला एक रक्षा करणारे कवच म्हटले आहे. पर्यावरणीय ज्ञानकोश (१९७५) नुसार पर्यावरण हे सर्व परिस्थितीकी आणि प्रभाव यांचे मिश्रण आहे जे जीवन आणि विकास यांना निर्माण करतात.

पर्यावरणाची सुरक्षा, सुधार आणि संसाधने यांचा उपयोग विकास योजना आणि कार्यक्रमाची स्थापनेची मार्गदर्शन सिद्धांत राहिले आहे. पण खरच असे काही विकास कार्यक्रम आणि परियोजना नाही आहे ज्याचे पर्यावरणावर परिणाम झाले नाहीत. पर्यावरणाचे दोन रूप आहे. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आणि दोन्ही पण मानवाच्या कल्याण आणि मौलिक अधिकार याच्या उपयोगासाठी आवश्यक आहे. पर्यावरण संकल्पना मनुष्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरण संकल्पना सामाजिक, जैविक, तसेच साहित्य विज्ञान आणि रासायनीक कारणे यांचे समस्त विज्ञान आहे. जे मानवी वातावरण निर्माण करते. पर्यावरणामध्ये मानव संबंधितउपक्रम यांचा उपयोग केला जातो. त्यामुळे ‘मानवनिर्मित कार्याची अशाप्रकारे व्यवस्था करायला पाहिजे ज्यामुळे जैविक स्वास्थ्य, विविधता आणि पर्यावरणीय संतुलनसुरक्षित झाले पाहिजे.

**‘विकास’ प्रक्रियेचा पर्यावरणावर होणारे गंभीर परिणाम :**

पर्यावरण आणि विकास हि मुळात वेगवेळी आव्हाने नाहीतच ती परस्परात गुंतलेली आहेत. पर्यावरण साधनाच्या डगमगत्या पायावर विकास कधीही साध्य होऊ शकत नाही आणि पर्यावरणाच्या विनाशाकडे दुर्लक्ष करून विकासाच्या वाटेवर अग्रेसर राहण्याचे पर्यावरणाचे संरक्षण होणेही कधीच शक्य होऊ शकत नाही. विस्कळीत संस्था आणि नीती यांच्या मदतीने हे निर्माण झालेले प्रश्न कारणे आणि परिणामांच्या एका गुंतागुंतीच्या पद्धतीशी जोडलेले आहेत. यात सर्वप्रथम असे लक्षात येते कि, पर्यावरणाचे विविध ताण हे परस्परावलंबी आहेत.

उदाहरणार्थ : जंगलतोड झाल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत टिकून राहू शकत नाही, ते आपल्या बरोबर माती वाहून नेते आणि त्यामुळेच नद्या, तळ्यामध्ये गाळ निर्माण होतो. असे एकमेकात गुंतलेले प्रश्न पाहिल्यावर लक्षात येते कि, पर्यावरणाच्या वेगवेगळ्या प्रश्नाची उत्तरे एकत्रित विचार करूनच शोधावी लागतात. उदाहरणार्थ : जंगल वाचवण्यात जर आपल्याल्या यश आले, तर आपआपोच जमिनीचे संरक्षण करण्यात सुद्धा यश आले असे समजता येईल. यामध्ये दुसरी महत्वाची गोष्ट सांगता येईल कि, पर्यावरणावर पडणारा ताण आणि आर्थिक विकासाच्या विविध पद्धती यामध्ये देखील परस्पर सबंध आहे. त्याचप्रकारे शेतीसंबंधी जमीन, पाणी, आणि जंगलाच्या विनाशाला देखील विकास हा बाधक ठरतो. अनेक विकसनशील

देशांमध्ये उर्जा नीतीचा 'ग्रीन हाउस इफेक्ट' आम्लीकरण आणि इंधनासाठी करण्यात आलेली जंगलतोड या गोष्टींशी सरळ सबंध आहे. पर्यावरणातील या सर्व ताणामुळे आर्थिक विकासावरही मोठे असे संकट आलेले आहे. म्हणूनच अर्थव्यवस्था आणि पर्यावरणातील एकत्रित विचार फक्त पर्यावरण संरक्षण कायदे करण्यापुरताच मर्यादित नसून विकासाचे संरक्षण म्हणजेच पर्यावरण नाही. तर मानवाच्या विकासासाठी या दोन्ही गोष्टीचे महत्व सारखेच आहे.

सर्व पर्यावरणीय आणि आर्थिक प्रश्न हे इतर अनेक सामाजिक व राजकीय पैलुंशी नकळत जोडले गेलेले आहे. उदाहरणार्थ : कित्येक देशांमध्ये पर्यावरण आणि विकासावर पडणाऱ्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रचंड तानामागे समाजातील स्त्री चा दर्जा आणि सांस्कृतिक मुल्ये, हि कारणे आहेत. याचबरोबर पर्यावरणातील तान आणि विषम विकास या दोन्ही बाजूनी होणाऱ्या हल्यामुळे सामाजिक तणावही वाढतात. समाजाअंतर्गत सत्ता आणि शक्तीचे वाटप हा देखील पर्यावरण आणि विकासाच्या आवाहनाच्या मुळाशी असलेला एक महत्वाचा पैलू आहे. याकरिता सामाजिक विकासाचे कार्यक्रम असलेल्या नवीन पद्धती शोधाव्या लागतील.

पर्यावरण पद्धती राष्ट्रीय सिमारेषांचा सन्मान करीत नाहीत. पाण्याचे प्रदूषण हे समतेच्या भावनेने वाटल्यासारखे नद्या, तळे, समुद्र यातून सर्वत्र वाहत जाते. हवेचे प्रदूषण दूरपर्यंत पसरले जात. जे परमाणु आणि विषारी पदार्थांच्या साठयांशी सबंधित असलेले भयंकर अपघात आपला परिणाम जगाच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत दाखवू शकतात. पर्यावरण व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यातील अनेक परस्पर सबंध उभ्या जगात आपला प्रभाव दाखवतात. उदाहरणार्थ : अधिकाधिक आर्थिक लाभाची हाव असणाऱ्या शेती पद्धतीमुळे विकसनशील देशांमध्ये उत्पन्न इतके वाढते कि, येथील गरीब शेतकरी जुन्या पारंपारिक पद्धतीने केलेली शेती यामुळे वर येउच शकत नाही. या दोन्ही पद्धती जमिन आणि पर्यावरण साधनाचा नाश करतात. भले प्रत्येक देश आपल्या नजीकच्या आर्थिक आणि राजकीय भल्यासाठी शेतीविषयक राष्ट्रीय नीती ठरवीत असेल. परंतु दुसऱ्या देशाची शेती आणि व्यापार धोरणाची सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या योग्य मूल्यमापन करणारी नीती आपल्या देशात आखू शकत नाही.

जगभरच पर्यावरणाशी संबंधित गोष्टींची जबाबदारी सुरुवातीला फक्त पर्यावरण मंत्रालय आणि संस्थाचीच मानली गेली. शेती उद्योग, नगरविकास, वन आणि परिवहनाशी सबंधित धोरणामुळे होणाऱ्या विनाशावर त्यांचे काहीच नियंत्रण राहिले नाही. ज्यांच्या नितीमुळे पर्यावरणाचे नुकसान झाले, त्या क्षेत्रातील संस्था आणि मंत्रालयावर हि जबाबदारी कधीही सोपविली गेली नाही. त्यामुळेच आपल्या पर्यावरण व्यवस्थेच्या पद्धती केवळ विनाशानंतरच्या मलमपट्टीचेच काम करीत राहिल्या. पुन्हा वनीकरण करणे, पुन्हा

वाळवंट सुपिक बनवणे, शहरांची पुनःमांडणी करणे, पर्यावरण विनाशाच्या पूर्व सूचना मिळवण्यासाठी आणि तोच विनाश थांबवण्याची क्षमता प्राप्त करण्यासाठी, कोणत्याही क्षेत्रातील नीती निश्चित करीत असताना तिच्या आर्थिक व्यापारी आणि इतर पैलुबरोबरच पर्यावरणीय पैलूकडेही तितकेच लक्ष देणे गरजेचे आहे.

आज अनेक देशांनी विनाशापासून बचाव करण्यासाठी पर्यावरण नीती आखलेल्या आहेत. त्या प्रगती साधतात देखील, त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. पण तेवढे पुरेसे नाही. उत्पादनाबरोबरच नैसर्गिक साधनांचे संरक्षण आणि विकास यांचा विचार अंतर्भूत असणारा एक नवा दृष्टीकोन आत्मसात करण्याची गरज आहे. या दोन्ही संयोगाने, नैसर्गिक साधनावर समान हक्क असणारे एक नवे जीवन सर्व लोकांना मिळेल.

**निष्कर्ष :**

१. विकास प्रकल्पांमुळे पर्यावरणावर विघातक परिणाम होत आहे.

२. विकास प्रकल्पांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो आहे. याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे.

३. कोणताही विकास प्रकल्प उभारताना शाश्वत विकासाचा विचार होताना दिसत नाही.

**संदर्भसूची:**

अ. इंग्रजी पुस्तके, आणि लेख.

1. Verghese B.J Water And Hope- Integrated Water Resources Development An Regional Cooperation Within The Himalayan –Gurga On Brhmaputra - Barobasin, P.208
2. A Report, Extracts From The Draft National Policy On Devolpmental Resettlement Of Project Affected People", Prepared By National Working Group On Displacement Lokayan, 13 Alipur Road Delihi
3. Patekar Medha (1989), "The Tragik Story Of The Displaced A Case Study Of The Trials Affected By The Sardar Sarovar", Report Of Workshop On Rehabilization Of Persons Displaced By Devolpment Project, 5,6;7 Edited By A.P Farnadez, Sponsored By Institute For Socil Economic Chane And Myrda Banglore, Publication : Research Programme Committee Planning Commission.
4. Opicite, A A Report : Lokayam

5. Giddens, Anthony (1990) The Consequences Of Modernity.
6. Narayan, Sunita (2017) Conflicts Of Interest : My Journey Through India's Green Movement.
7. Beck, Ulrich (2014) An Introduction To The Theory Of Second Modernity And The Risk Society.
8. Gladon, G. E : Daynamics Of Public Administration, Reinhert, New York 1971.Pp 290-91
9. Second Report Of The Independent Commission On International Development Issues, Common Crisis : Nort – South Co-Oparation For World Recovery, London, Pan Books, 1983, P.126.
10. Quoted From The Commonwealth Current, Aug-Sept., 1992, P.2
11. arun. C vakil : economic aspects of environmental pollution in india, Bombay, 1984, p.98.

मराठी आणि हिंदी पुस्तके आणि लेख :

१. मुन्शी, आई, २००० "एनवायरमेन्ट इन सोशोलोजीकल थ्योरी" सोशोलोजीकल बुलेटीन, खंड ४९, संख्या २ २५८-६२.
२. शिवा वी, १९९१, इकोलोजी एंड द पोलिटिक्स ऑफ सरवाइवल : युएन युनिवर्सिटी प्रेस एंड सेज पब्लिकेशन : नवी दिल्ली.
३. यु.एन.डी.पी. २००३; ह्यु मन डेवलपमेंट रिपोर्ट, ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेस : नवी दिल्ली.
४. द्विवेदी, शिवनारायण : भारतीय धर्म और राजनीतिक संप्रदाय दैनिक भास्कर, ग्वालियर, २५ अगस्त.
५. जैन आर. के. : भारतीय समाज, अधिकारी-तंत्र और प्रशासन, १९८९